17 JUN 2018
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग : विविध तरुण मंडळे, तालीम, संस्था यांच्यातर्फे प्रतिमा, तसेच मूर्ती पूजनाचे आयोजन**

# शहरात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३४५ वा राज्याभिषेकदिन सोहळा बुधवारी उत्साहात साजरा करण्यात आला. विविध तरुण मंडळे, तालीम, संस्था यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा व मूर्ती पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विविध ठिकाणी व्याख्याने, शाहिरी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



**श्री राधाकृष्ण सत्कार्य संवर्धन मंडळामार्फत**

मंगळवार पेठ, खासबाग परिसरातील श्री राधाकृष्ण सत्कार्य संवर्धन मंडळामार्फत सकाळी सहा वाजता सूर्योदयावेळी शिवराज्याभिषेकदिन सोहळा झाला. यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पुष्पवृष्टी व फटाक्यांची आतषबाजी करुन शिवरायांचा जयघोष केला. त्यानंतर महिलांच्या हळदी-कुंकवाचा कार्यक्रम होऊन प्रसाद वाटप करण्यात आला.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रदीप मराठे, उपाध्यक्ष विवेक कोरडे, विलास गौड, किशोर भोसले, राजू जाधव, बाळासाहेब शिंदे, प्रदीप गौड, अनिल गौड, रोहित कारंडे, सुधाकर जाधव, अजित जाधव, अजित आयरेकर, दीपक विचारे, अजय भोसले, राजू काटे, शशांक जाधव, अभिषेक आयरेकर व भागातील व परिसरातील लोक उपस्थित होते.

**समता हायस्कूल**

कोल्हापूर जिल्हा खादी व ग्रामोद्योग संघ, कोल्हापूर जिल्हा सर्वोदय शिक्षण मंडळ संकुल शाळा, कोल्हापूर जिल्हा स्वातंत्र्यसैनिक संघटना व म. दुं. श्रेष्ठी समता हायस्कूलच्या वतीने संस्थेच्या कार्यालयात सुंदरराव देसाई यांनी 'छत्रपती शिवाजीराजे' या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी दादासो जगताप, प्रा. सदाशिव मनुगडे, प्रा. आशाताई कुकडे, प्रा. डी. एन. चौगुले, प्रा. सुजय देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संघाचे सचिव एस. एस. तुप्पद, सखाराम सुतार, आदी उपस्थित होते.

**श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर या संस्थेमध्ये प्रतिमेचे पूजन संस्थेचे चेअरमन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे उदय देसाई, ए. व्ही. जाधव, सर्जेराव जाधव, संस्थेचे अनेक सदस्य व सेवक उपस्थित होते.

## बंगलोरचा पुष्पहार अर्पण

रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास गेली सात वर्षे खास बंगलोर येथून गुलाब पुष्पहार तयार करुन तो अर्पण केला जातो. तिथूनच शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास बंगलोरहून आणलेला गुलाब पुष्पहार अर्पण करण्यात आला. संताजी घोरपडे, धैर्यशील पाटील, अमल लाड यांनी पुढाकार घेवून हा उपक्रम राबविला. पुतळा परिसरात विकास पाटील यांनी आकर्षक फुलांची सजावट केली होती. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठातील अधिकारी व सकाळी फिरण्यासाठी येणारे अनेक नागरिक उपस्थित होते.

**राजर्षी शाहू गव्हर्न्मेंट सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह बँक**

राजर्षी शाहू गव्हर्न्मेंट सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास बँकेचे अध्यक्ष रवींद्र पंदारे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संचालक मधुकर पाटील, शशिकांत तिवले, प्रकाश पाटील, राजेंद्र चव्हाण, भरत पाटील, अतुल जाधव, रमेश घाटगे, आदी उपस्थित होते.

**हिंदू एकता आंदोलन**

मिरजकर तिकटी येथील हिंदू एकता आंदोलनच्या कार्यालयात मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव मुळीक यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी अपेक्षा सकटे, देवयानी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी चंद्रकांत बराले, लालासो गायकवाड, जयदीप शेळके, अजित तोडकर, गजानन तोडकर, नंदू सुतार, शरद पोवार, मेघा पाटील, आदी उपस्थित होते.

12 JUN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोल्हापूर, ता. ६ : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आज शहर आणि परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन झाले. सकाळी पुतळ्याला अभिवादन, मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके असे विविध उपक्रम झाले. सायंकाळनंतर मिरवणुकीसह आतषबाजी झाली.



कोल्हापूर : कृष्णा ग्रुप व टाऊन हॉल मॉर्निंग ग्रुपच्या वतीने टाऊन हॉलमधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन झाले.



कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी श्री. व्ही. टी. पाटील, प्रा. डॉ. विजय ककडे, उपकुलसचिव डॉ. विलास सोयम, श्री. ए. एस. नलवडे, कायदा अधिकारी अॅड. अनुष्का कदम, सहायक कुलसचिव बी. एन. वाघमोडे आदी.



कोल्हापूर : निवृत्ती चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला अभिवादन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार, राजू जाधव, अवधूत साळोखे, किरण पडवळ आदी.



कोल्हापूर : शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला यूथ सोशल पॉवरच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

17 JUN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस बनतोय 'मिनी जंगल'

**कोल्हापूर : विजय पाटील**

हिरवीगार वनराई... पक्ष्यांचा सुरेल किलबिलाट... खिडकीतून थुई थुई नाचणाऱ्या मोराचा स्वर्गीय नजारा आणि त्याच्या सोबतीला पिंजलेल्या कापसासारख्या सशांच्या जोड्या... अशा सदाबहार वातावरणात शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी लवकरच मिळण्याची शंभर टक्के खात्री आहे. कारण, विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये पुढील महिन्यानंतर पंचवीस हजारांहून अधिक वृक्ष असणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर ८५३ एकर इतका व्यापक आहे. विद्यापीठाचा परिसर अलीकडे हिरवागार बनला आहे. त्यामुळे या ठिकाणी मोर, ससे, मुंगूस आदी प्राण्यांची संख्या वाढत आहे. या प्राण्यांचा अधिवास तयार होत आहे. राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण मोहिमेमुळे विद्यापीठात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जाते. आजमितीला विद्यापीठाच्या परिसरात चौदा हजार वृक्ष आहेत. लहान झाडाझुडपांची संख्याही मोठी आहे.

- २५ हजार झाडांचा हिरवागार परिसर
- वड, पिंपळ, चिंच आदी देशी झाडे
- मोर, ससे, मुंगूस आदींचा अधिवास



यंदाच्या पावसाळ्यात पुन्हा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये परिसरातील १० एकर क्षेत्रावर वन विभागाच्या वतीने ११ हजार १११ वृक्षांची लागवड केली जाणार आहे. तर विद्यापीठाकडून ६०० झाडे लावली जात आहेत. या झाडांमध्ये वड, पिंपळ, जांभूळ, देशी आंबा, चिंच, उंबर अशी देशी झाडे प्राधान्याने लावली जात आहेत. यासाठी खड्डे खोदाई करण्यात आली आहे.

याचा सरळ अर्थ असा की, विद्यापीठाच्या परिसरात एकूण पंचवीस हजारांहून अधिक झाडे असणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे ही सगळी झाडे डेरेदार असणार आहेत. आगामी अडीच-तीन वर्षांत बहुतांश कॅम्पस हिरवागार होईल, असे दिसते. इतक्या मोठ्या प्रमाणावर वनराई असल्याने पशू-पक्ष्यांची संख्याही वाढणार आहे. सध्या कॅम्पसमध्ये बाराशेच्यावर मोर आहेत. ससे, मुंगूस आहेत. आता या प्राण्यांची संख्या वाढेलच. याशिवाय इतर काही प्राण्यांचाही यामध्ये सहभाग वाढेल. त्यामुळे विद्यापीठाचे कॅम्पस कविवर्य रविंद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन या झाडाखालच्या शाळेसारखे निसर्गसंपन्न दिसेल. वाहनांचा गोंगाट, धुराचे प्रदूषण आणि रोजच्या धावपळीच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक प्रांगण हे मिनी जंगलासारखे असणार आहे. त्यामुळे आगामी दोन-तीन वर्षांत हे 'मिनी जंगल' विद्यार्थ्यांना वर्गात लेक्चर सुरू असताना अनुभवता येईलच. त्याशिवाय कँटिनमध्ये कटिंग चहा पिताना एखादा मोर नाचताना दिसेलच. पिटुकला ससाही समोरून गवतात पळताना पाहायला मिळेल.

**कॅम्पस निसर्गसंपन्न होतोय**

शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस तुलनेने निसर्गसंपन्न आहे; पण प्रशासनाच्या पुढाकाराने आता अधिक हिरवागार कॅम्पस निर्माण केला जात आहे. विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. त्यामुळे उन्हाळ्यात वृक्षांना पाण्याची टंचाईसुद्धा भासणार नाही.

**– व्ही. एन. शिंदे**, प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
[illegible] JUN 2018
सकाळ



कोल्हापूर : कुलगुरू देवानंद शिंदे यांना निवेदन देताना सुहास साळोखे. सोबत अजिंक्य दळवी, फिरोज सरमुर आदी.

# खेळाडू विद्यार्थ्यांना ग्रेस गुण, भत्ता द्या

**कोल्हापूर :** महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठाकडून खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रेसचे २५ गुण, २५० रु भत्ता आणि स्पर्धेपुरता विमा या सुविधा द्याव्यात. अशी मागणी राष्ट्रवादी क्रीडा सेलचे अध्यक्ष सुहास साळोखे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी कुलगुरू देवानंद शिंदे यांना दिले.

विद्यार्थी खेळाडू अभ्यास सांभाळून खेळत असतात. यासाठी त्यांना परीक्षेमध्ये ग्रेसचे २५ गुण देण्याची सुविधा आहे, मात्र शिवाजी विद्यापीठात हे गुण दिले जात नाहीत. तसेच विद्यार्थी खेळाडूंना २५० रु भत्ता देण्यात यावा. हे निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळामध्ये अजिंक्य दळवी, फिरोज सरगूर, संजय पडवळे, अभिषेक शिंदे यांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 JUN 2018
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाला हवाय सुवर्णनिधी



शासनदरबारी प्रलंबित असलेल्या सुवर्णमहोत्सवी निधीपैकी आतापर्यंत शिवाजी विद्यापीठाला ५ कोटी ५६ लाख रुपये मिळाले आहेत. अजून ३९ कोटी ४४ लाख रुपये राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत. डिसेंबर २०१७ मध्ये या निधीच्या मागणीचा प्रस्ताव शासनाला पाठविला आहे. सन २०११ मध्ये विद्यापीठाला सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने आवर्ती (वेतन) आणि अनावर्ती (बांधकाम) असा एकत्रितपणे ४५ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. आतापर्यंत एकूण निधीपैकी ५ कोटी ५६ लाख रुपये मिळाले आहेत. सुवर्णमहोत्सवी निधी देण्याबाबत भाजप-सेना सरकारकडून ठोस कार्यवाही झालेली नाही. कदाचित या निधीच्या मागणीसाठी आंदोलन होत नसल्याने सरकारचे त्याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUN 2018
पुढारी

# पश्चिम घाटाचे अभ्यासक डॉ. यादव यांना जीवन गौरव पुरस्कार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ व पश्चिम घाटाचे अभ्यासक डॉ. एस. आर. यादव यांना केंद्रीय पर्यावरण वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या वतीने इ. के. जानकी अम्मल जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठामध्ये विकसित केलेल्या 'स्कूल ऑफ टेक्सॉनॉमी'साठी हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. हा पुरस्कार मिळालेले डॉ. यादव हे महाराष्ट्रातील एकमेव संशोधक आहेत. डॉ. यादव यांनी सत्तरहून अधिक वनस्पतींचा शोध लावला. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे विभाग प्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे. २०१४ साली ते निवृत्त झाले आहेत. शिवाजी विद्यापीठात त्यांच्या संकल्पनेतून पश्चिम घाटातील दुर्मिळ वनस्पतींची 'लीड बॉटनिकल गार्डन' साकारली आहे. त्यांनी संशोधन करून लिहिलेला वनस्पती कोष हा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.